जा.क्र.शिउसं/पुवि/उमाशि-१/रा.मतदार दिन/२०११-१२
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,
पुणे . यांचे कार्यालय,
दिनांक : ९.१.२०१२

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या
----------------------------
----------------------------
----------------------------

विषय : राष्ट्रीय मतदार दिवस (National Voters Day) निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा घेणेबाबत..
संदर्भ : मा.जिल्हाधिकारी पुणे क्र.पीईई/३/वशी/लेख/२०११ दिनांक १६/१२/२०११ चे पत्र

केंद्र शासनाचे विधी व न्याय मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच ११०१९/१२/२०१०-लिग रोमन दोन दिनांक २१ जानेवारी २०११ अन्वये भारत निवडणूक आयोगाने दरवर्षी प्रमाणे दिनांक २५ जानेवारी २०१२ हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस (National Voters Day) म्हणून साजरा करण्याचे निर्देशित केलेले आहे.

मतदार जागृतीसाठी अनेक वेगवेळे उपक्रम घेता येणे शक्य आहे. महाविद्यालयांतील तरुण मतदार हा निश्चतच जागरुक मतदार असतो. त्यासाठी ,निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घ्यावयाच्या आहेत.

त्यासाठी आपल्या महाविद्यालयात निबंधस्पर्धा व वक्तृत्वस्पर्धोचे आयोजन करावे.शालेय स्तरावरील पहिल्या दोन क्रमांकांचे विद्यार्थी/विद्यार्थीनी तालुकास्तरीय स्पर्धेसाठी पाठवावेत. तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमधून प्रथम दोन क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांना दिनांक २० जानेवारी २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता आबासाहेब गरवारे महाविद्यालयात जिल्हास्तरीय अंतिम स्पर्धेसाठी पाठवावे. त्याप्रमाणे तालुकास्तरावर प्राप्त झालेल्या निबंधामधून पहिल्या दोन क्रमांकाचे निबंध पाठवावे. (वक्तृत्व व निबंध दोन्हीमध्ये प्रत्येकी) निबंध स्पर्धेचे विद्यार्थी पाठवू नयेत.

दिनांक २० जानेवारी २०१२ रोजी अंतिम स्पर्धा होईल. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळणा-या विद्यार्थ्याचा जिल्हाधिकारी, पुणे यांच्या हस्ते दिनांक २५/१/२०१२ रोजी -------------- वाजता---------------- ठिकाणी सत्कार केला जाईल.

निबंध स्पर्धेचे केवळ निबंध पाठवावेत विद्यार्थी पाठवू नयेत.

..२..

.

**वक्तृत्व स्पर्धेचे विषय**

१. मतदार जागृत आहे काय ?
२. महिला उमेदवार सक्षम आहे काय ?
३. सध्याची निवडणूक प्रक्रिया परीपूर्ण आहे काय ?

**स्पर्धेला वेळ ५ मिनिटे**

**निबंध स्पर्धा विषय**

१. निवडणूक सुधारणा
२. मतदार जागृती
३. उमेदवार काल आणि आज
४. महिला मतदारांचे प्रतिनिधीत्व

प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात निबंध स्पर्धा आयोजित करुन त्यामधुन प्रथम व व्दितीय क्रमांकाचे फक्त निबंध तालुकास्तरीय स्पर्धेसाठी पाठवावेत ( विद्यार्थ्यांना पाठवू नये) प्रत्येक तालुक्यातुन प्रथम व व्दितीय क्रमांकाचे निबंध जिल्हा पातळीसाठी पाठवावेत. विद्यार्थ्यांना पाठवू नये. तालुकास्तरीय स्पर्धेचा निकाल पुढील नमुन्यात पाठवावा.

| अ.क्र. | स्पर्धेचे नांव | विद्यार्थ्याचे नांव | क्रमांक | क.म.वि. चे नांव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व निबंध स्पर्धा दिनांक १३ जानेवारी २०१२ रोजी आयोजित कराव्यात शालेय स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेतील पहिल्या व दुस-या क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची नावे तालुकास्तरीय स्पर्धेसाठी पाठवावीत. तालुकास्तरीय स्पर्धेमधून पहिला व दुसरा क्रमांक मिळविणा-या विद्यार्थी व विद्यार्थीनीस जिल्हा स्तरीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी पाठवावे.
वक्तृत्व स्पर्धेचे वेळापत्रक पुढील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | स्पर्धेचा तपशिल | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | शालेय स्तरीय स्पर्धा | १४/१/२०१२ | |
| २ | तालुका स्तरीय स्पर्धा<br>१.निबंध स्पर्धा<br>२.वक्तृत्व स्पर्धा | १७/१/२०१२ | १.टी.सी.कॉलेज,बारामती<br>२.से.ज्यो.ज्युनिअर कॉलेज, दौंड<br>३.कला वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर<br>४.वाघेरे कॉलेज, सासवड,ता.पुरंदर<br>५.हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, खेड<br>६.आण्णा साहेब औटे कॉलेज मंचर ता.आंबेगाव<br>७.सी.टी.बोरा महाविद्यालय,घोडनदी, ता.शिरुर<br>८.श्री.शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर<br>९.इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ.<br>१०.सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय, अंबावडी,ता.वेल्हा<br>११.छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, पौड, ता.मुळशी<br>१२.आर.आर.कनिष्ठ महाविद्यालय, भोर,ता.भोर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १३.साधाना कनिष्ठ महाविद्यालय (मुलांचे) हडपसर<br>(हवेली ग्रामीण साठी)<br>१४. पुणे शहर :-<br>१.नेस वाडीया कॉलेज,पुणे<br>२.मराठवाडा मित्र मंडळ,पुणे<br>३.म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी,पुणे |
| ३ | जिल्हा स्तरीय स्पर्धा<br>वक्तृत्व स्पर्धा<br>निबंध स्पर्धा | २०/१/२०१२ | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१करिता

प्रत :

१. मा.जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, पुणे
२. शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परीषद पुणे.
३. पुणे जिल्हयातील सर्व गटशिक्षण अधिकारी , यांनी तालुकास्तरावरील स्पर्धेचा निकाल उपप्राचार्य फर्ग्युसन कॉलेज, व उपप्राचार्य,आबासाहेब गरवारे कॉलेज,पुणे यांचेकडे अनुक्रमे वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे प्रथम व व्दितीय क्रमांकाचा अहवाल वरील परिपत्रकात सुचविल्याप्रमाणे हस्तपोच सादर करावा.
४. प्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज, पुणे
५. प्राचार्य, आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे

Sheikh Doc missal

जा.क्र.शिउसं/पुवि/उमाशि-१/रा.मतदार दिन/२०११-१२
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,
पुणे . यांचे कार्यालय,
दिनांक : १०.१.२०१२

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे-

विषय : राष्ट्रीय मतदार दिवस (National Voters Day) निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा घेणेबाबत..
संदर्भ : मा.जिल्हाधिकारी पुणे क्र.पीईई/३/वशी/लेख/२०११ दिनांक १६/१२/२०११ चे पत्र

केंद्र शासनाचे विधी व न्याय मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच ११०१९/१२/२०१०-लिग रोमन दोन दिनांक २१ जानेवारी २०११ अन्वये भारत निवडणूक आयोगाने दरवर्षी प्रमाणे दिनांक २५ जानेवारी २०१२ हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस (National Voters Day) म्हणून साजरा करण्याचे निर्देशित केलेले आहे.

मतदार जागृतीसाठी अनेक वेगवेळे उपक्रम घेता येणे शक्य आहे. महाविद्यालयांतील तरुण मतदार हा निश्चतच जागरुक मतदार असतो. त्यासाठी ,निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घ्यावयाच्या आहेत.

या विषयाबाबत या कार्यालयाचे दिनांक ९ जानेवारी २०१२ चे परिपत्रक सोबत जोडलेले आहे. त्याप्रमाणे पुणे जिल्हयातील सर्व गटशिक्षणअधिकारी यांना सदर परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्यास्तरावरुन कळवावेत. तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी आपआपल्या तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना सदरचे परिपत्रक कळवून त्याप्रमाणे स्पर्धा घेण्यास कळवावे. व स्पर्धांचा अहवाल सोबतच्या परिपत्रकातील नमुन्यामध्ये शाळास्तरावरील तालुकास्तराकडे व तालुकास्तराकडील अहवाल जिल्हास्तराकडे सदरच्या परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे पाठविण्याची व्यवस्था करावी.

तालुकास्तरावर व जिल्हा स्तरावर फक्त वक्तृत्व स्पर्धेचे विद्यार्थी पाठवावेत. निबंध स्पर्धेचे फक्त पहिल्या व दुस-या क्रमांकाचे निबंध तालुकास्तरावर पाठवावेत. तालुकास्तरावर प्राप्त झालेल्या निबंधामधून फक्त पहिल्या व दुस-या क्रमांकाचे निबंध उपप्राचार्य, आबासाहेब गरवारे कॉलेज पुणे यांचेकडे वेळेत सादर करावेत. तसेच वक्तृत्व स्पर्धेचे विद्यार्थी २० जानेवारी २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत आबासाहेब गरवारे कॉलेज येथे विद्यार्थी पाठवावेत.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

प्रत : सर्व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, जि.पुणे.यांनी उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

Sheikh Doc missal